# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन (Representation) क्रमांक १०२ / २०२३**

वीज देयकाबाबत

श्री. हरीभाऊ दिंगबर खापरे ........................................................................................................ अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, (महावितरण) कवठेमहाकाळ विभाग ............................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- श्री. हरीभाऊ दिंगबर खापरे

प्रतिवादीतर्फे :- श्री बाळासो भागवत हळनोर, कार्यकारी अभियंता, कवठेमहाकाळ

कोरम :- वंन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

ई-सुनावणी तारीख :- ११ जानेवारी २०२४

आदेश पारित दिनांक :- २५ जानेवारी २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ (मंच) यांच्या अपिलार्थी यांचा अर्ज (क्रमांक १८ / २०२३) दिनांक १७ जुलै २०२३ च्या आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थींने सदरचे अभिवेदन दिनांक ३ ऑक्टोंबर २०२३ रोजी दाखल केले आहे. मंचाने सदरच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले :

*"१. तक्रारदार ग्राहकांचे गाऱ्हाणे खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.*

*२. वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकांस SOP सन २०२१ मधील विनियम १६.१.२ नुसार मीटर रिडींगनुसार नियमित वीज देयके द्यावी.*

*३. वि.प. विद्युत वितरण कंपनीने तक्रारदार ग्राहकांस डिसेंबर २०२२ चे वीज देयक देणेस ६० दिवसापेक्षा विलंब केल्याने सदर वीज देयकात २ % सुट देण्यात यावी.*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक ११ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

- अपिलार्थी राहणार - देवनाळ, तालूका - जत, सांगली हे महावितरणचे दिनांक ३० जून २०२२ पासून ३ अश्वशक्ती कृषीपंप ग्राहक (क्र.२७०२००००४२४५) आहेत. अपिलार्थीने नमुद केले की, जत तालुक्यात शेतीपंप मीटर रिडींग घेणेसाठी महावितरणने एजन्सी नेमलेली आहे, परंतू या एजन्सीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रत्यक्षातील मीटर रिडींग प्रमाणे देयकेच दिली नाहीत, याबाबत अपिलार्थीने महावितरण कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करूनही, त्यावर कोणतीही कारवाई झाली नाही.
- अपिलार्थीचे शेतीपंप मीटर रिडींग घेण्यास कोणीही जागेवर आले नाही व अचानक दिनांक ७ डिसेंबर २०२२ रोजी अपिलार्थीच्या मोबाईलवर महावितरण कंपनीचा मॅसेज आला, की, रू.२८००/- शेतीपंप थकबाकी भरा. परंतू, जर मीटर रिडींग घेतले गेले नाही, वीज देयकेच दिली नाहीत तर थकबाकी कशी? यामुळे अपिलार्थीने मंचाकडे दिनांक १३ मार्च २०२३ रोजी तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक १७ जुलै २०२३ रोजी कृतीमानके २०२१ मधील विनियम १६.१.२ नुसार मीटर रिडींगनुसार नियमित वीज देयके द्यावी; तसेच, तक्रारदार ग्राहकांस डिसेंबर २०२२ चे वीज देयक देणेस ६० दिवसापेक्षा विलंब केल्याने सदर वीज देयकात २ %सुट देण्यात यावी; असा निर्णय दिला.
- मंचाच्या आदेशाचे पालन झाले नाही, म्हणून अपिलार्थीने दिनांक ३ ऑक्टोंबर २०२३ रोजी माननीय विद्युत लोकपाल, मुंबई कार्यालयात तक्रार दाखल केली. अपिलार्थीने त्यांच्या अभिवेदनात खालील प्रमाणे मागण्या मांडल्या आहेत.
  - मंचाच्या आदेशाचे पालन केले नाही, म्हणून कोल्हापूर मंचाकडे निवेदन दिले असता ते स्वीकारले नाही व अपिलार्थीची बाजू मांडण्याची संधी दिली नाही. त्याबाबतच्या सुचना कोल्हापूर मंचास द्याव्यात.

- ग्राहक हिताचे रक्षण व हक्क या बाबत योग्य तो आदेश व्हावा.
- मंचाच्या आदेशाचे पालन करण्यात यावे.

३. प्रतिवादी महावितरणने दिनांक २८ डिसेंबर २०२३ च्या उत्तरातील व दिनांक ११ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या ई-सुनावणीतील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

➢ अपिलार्थी राहणार - देवनाळ, तालूका - जत, सांगली हे महावितरणचे दिनांक ३० जून २०२२ पासून ३ अश्वशक्ती कृषीपंप ग्राहक (क्र.२७०२०००० ४२४५) आहेत. अपिलार्थीने नमुद केले की, जत तालुक्यात शेतीपंप मीटर रिडींग घेणेसाठी महावितरणने एजन्सी नेमलेली आहे, परंतू महावितरणने मीटर रिडींग प्रमाणे देयकेच दिली नाहीत, याबाबत अपिलार्थीने महावितरण कार्यालयाकडे वारंवार तक्रार केल्याचे नमुद केले आहे. तथापि, अपिलार्थीस खालील प्रमाणे वीज देयके देण्यात आली होती. हे प्रतिवादी महावितरणने स्पष्ट केले.

| | | |
|---|---|---|
| त्रैमासीक वीज देयक दिल्याचा तपशिल | सप्टेबर २०२२ | ५०० युनीटस सरासरी वापर |
| | डिसेंबर २०२२ | १३४० युनीटस सरासरी वापर |
| | मार्च २०२३ | ३२ युनीटस मीटर वाचनाप्रमाणे |
| | जून २०२३ | ६७ युनीटस मीटर वाचनाप्रमाणे |

सप्टेबर २०२२ व डिसेंबर २०२२ या त्रैमासीक कालावधीतील सरासरीप्रमाणे दिलेल्या वीज देयकांचे मार्च २०२३ वीज देयकात बिलींग सिस्टीम प्रणालीद्वारे परतावा देण्यात आला होता. अपिलार्थींना सप्टेंबर २०२२ पासून वीज देयके दिली गेली आहेत. कृषीपंप मीटर मात्र रिडींग न घेता रू.२८००/- ची शेतीपंप वीज देय थकबाकी भरण्याबाबतचा मॅसेज अपिलार्थीस प्राप्त झाला, हे खरे असले, तरी, मार्च २०२३ मध्ये त्या सरासरी देयकांचा परतावा बिलींग प्रणालीद्वारे दिला आहे.

➢ मीटर वाचना प्रमाणे वीज देयके दिलीच नाहीत तर थकबाकी कशी. या बाबत अपिलार्थीने मंचाकडे दिनांक १३ मार्च २०२३ रोजी तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक १७ जुलै २०२३ रोजी, कृतीमानके २०२१ मधील विनियम १६.१.२ नुसार मीटर रिडींगनुसार नियमित वीज देयके द्यावी; तसेच, तक्रारदार ग्राहकांस डिसेंबर २०२२ चे वीज देयक देणेस ६० दिवसापेक्षा विलंब केल्याने, सदर वीज देयकात २ % सुट देण्यात यावी, असा निर्णय दिला.

म.वि.नि.आ.

- प्रतिवादीने नमुद केले की ज्या ठिकाणी वीज जोडणी दिली आहे, त्या ठिकाणी अपिलार्थी राहत नसल्याने, कदाचीत, त्यांना वीज देयके मिळाली नसतील. परंतू अपिलार्थीच्या मोबाईलवर संदेशाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रतिवादीने दिनांक ३० मार्च २०२३ रोजी मीटर रिडींग नुसार वीज देयक देण्यात दिली आहे.
- प्रतिवादीने नमुद केले की, त्यांनी मंचाच्या दिनांक १७ जुलै २०२३ च्या आदेशाचे पालन केले आहे. आदेशातील मुद्दा क्र.२ नुसार कृतीमानके आणि पॉवर क्वॉलिटी विनियम २०२१ मधील नियम १६.१.२ नुसार मीटर रिडींगनुसार वीज देयके नियमित देण्यात आलेली आहेत. मंचाच्या आदेशानुसार अपिलार्थीस २ % सुट दराने देय रक्कम रु.१९.२० ही माहे सप्टेंबर २०२३ वीज देयकात समायोजीत करण्यात आली आहे.
- मंचाच्या आदेशाचे पालन झालेले असल्यामुळे अपिलार्थीने मंचाकडे पुन्हा जाण्याचा प्रश्नच निर्माण होत नव्हता. अपिलार्थी हे महावितरणचे निवृत्त अभियंता आहेत. मंचाच्या आदेशाचे अनुपालन न केल्यास कोठे तक्रार करावयाची याबाबत ते सुपरीचीत आहेत. गेली अनेक वर्षे ते तक्रारदार ग्राहकाचे 'ग्राहक प्रतिनिधी' म्हणून कार्यरत आहेत. प्रतिवादीने विनंती केली की, अपिलार्थीचे अभिवेदन नामंजूर करण्यात यावे.

विश्लेषण व निर्णय

४. अपिलार्थी ग्राहकास ३ अश्वशक्ती कृषीपंप वीज जोडणी दिनांक ३० जून २०२२ रोजी दिली.

५. अपिलार्थीने नमुद केले की, त्यांना वीज जोडणी मिळाल्यापासून ते मंचाकडे तक्रार दाखल करेपर्यंत म्हणजे मार्च २०२३ पर्यंत वीज वापराचे 'वीज देयक' मिळाले नाही. त्यानंतर दिनांक ७ डिसेंबर २०२२ रोजी रक्कम रु.२८००/- चे वीज देयकाचा भरणा करावा, अन्यथा, वीज जोडणी खंडीत होईल या बाबतचा मॅसेज अपिलार्थीस प्राप्त झाला. परंतू वीज देयकच दिले नसल्यामुळे सदरची नोटीस बेकायदेशीर आहे.

६. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीस सप्टेंबर २०२२ पासून प्रत्येक त्रैमासीक कालावधीसाठीची वीज देयके देण्यात आलेली आहेत. सदर वीज देयके वीज देयकावर नमुद असलेल्या पत्त्यावर दिली जातात. तसेच, अपिलार्थी त्या ठिकाणी राहत नसल्याने, कदाचीत, त्यांना वीज देयके मिळाली नसतील. परंतू, अपिलार्थीच्या मोबाईलवर संदेशाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे; आणि त्यांना वेळोवेळी त्याबाबतचे संदेश पाठविण्यात आले आहेत. वरील सर्व वीज देयके, त्या त्या वेळी डिजीटल स्वरुपात

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

महावितरणच्या संकेत स्थळावर देखील उपलब्ध असतात. म्हणून वीज देयके दिली नाही हे अपिलार्थींचे म्हणने वा युक्तीवाद संयुक्तिक वाटत नाही.

७. प्रतिवादींनी दिनांक ३० मार्च २०२३ रोजी मीटर रिडींग नुसारचे माहे डिसेंबर २०२२ चे रू.९६०/- चे वीज देयक दिले आहे. मंचाच्या दिनांक १७ जुलै २०२३ च्या आदेशाप्रमाणे कृतीमानके आणि पॉवर क्वॉलिटी विनियम २०२१ मधील नियम १६.१.२ नुसार वीज देयकात २% सुट देणे आवश्यक आहे, त्यानुसार प्रतिवादीने ही सुट अपिलार्थीस २% दराने दिली असून, येणारी देय रक्कम रू.१९.२० ही, माहे सप्टेंबर २०२३ च्या वीज देयकात समायोजीत करून मंचाच्या आदेशाचे पालन केले आहे.

८. वरील सर्व बाबींचा विचार करता असे दिसते की, मंचाचे आदेश अमलात आणले नाहीत म्हणून अपिलार्थी परत मंचाकडे आपले गाऱ्हाणे घेऊन गेले. सदर गाऱ्हाणे मंचाने दाखल करून घेतले नाही, म्हणून सदरचे अभिवेदन दाखल केले आहे. तथापि, मंचाच्या आदेशातील कव्हरींग लेटरमध्ये (जावक क्र.काअ/ग्रातनिम/३५१ दिनांक १७ जुलै २०२३) याबाबत खालीलप्रमाणे नमुद केले आहे ....

> *"सदर आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर क्रमांक १, १३ वा मजला, कफ परेड, कोलाबा, मुंबई ४००००५ यांचेकडे तक्रार दाखल करता येईल."*

९. यावरून असे दिसते की, अपिलार्थी व मंच यांच्यात योग्य तो संवाद झालेला दिसत नाही. सबब, हा गाऱ्हाण्याचा विषय होऊ शकत नाही. तसेच, अपिलार्थींच्या इतर मागण्यांचे मंचाच्या आदेशाप्रमाणे पालन झालेले असल्यामुळे अपिलार्थींचे अभिवेदन फेटाळण्यात येऊन व निकाली काढण्यात येते.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)